**ठळक बातम्या**

- भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन

- लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध/ गरीब, शेतकरी, युवा आणि महिलांना केंद्रस्थानी ठेवून अनेक संकल्प

- भाजपाचा जाहीरनामा म्हणजे खोट्या आश्वासनांचं गाठोडं असल्याची काँग्रेसची टीका

- संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओ आणि भारतीय लष्करानं, रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांची केली यशस्वी चाचणी

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेतआज कोलकत्ता नाईट रायडर्स चा सामना लखनऊ सुपर जाएंट्स बरोबर, तर मुंबई इंडियन्सची लढत चेन्नई सुपर किंग्ज बरोबर रंगणार

**<><><><><>**

संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त आज देश त्यांना आदरांजली वाहत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज संसद परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यायशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, समाज-सुधारक आणि राजकीय नेते म्हणून देश आणि समाजासाठी अनन्यसाधारण योगदान दिल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भारताचे महान सुपुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारच नव्हे तर सामाजिक न्यायाचे धुरीण होते. सामाजिक विषमता आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न अनेक पिढ्यांना प्रेरणा देत असल्याचं उपराष्ट्रपती धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळेच आज भारत देशाची प्रतिमा वेगळी आहे. बाबासाहेबांच्या या दूरदृष्टी हीच विकासाची प्रेरणा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मेक इन इंडिया, स्मार्ट सिटी मिशन, मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया आणि स्टँडअप इंडिया सह विकासाच्या अनेक योजना आंबेडकर यांच्या दूरदृष्टीमधूनच साकारल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

दरम्यान, मध्य प्रदेशातील महू या बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळी त्यांच्या जयंतीनिमित्तानं विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री मोहन यादव सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईत राज्यपाल रमेश बैस यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादरच्या चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. त्यावेळी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, शहर जिल्हाधिकारी संजय यादव उपस्थित होते. यावेळी हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. चैत्यभूमी परिसरात दर्शनासाठी अनुयायांच्या रांगा लागल्या आहेत. महानगरपालिकेने चैत्यभूमी इथं विविध कार्यक्रमांचं आयोजन ही केलं आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं चैत्यभूमी इथलं स्मारक, राजगृह इथलं त्यांचं निवासस्थान आणि आजूबाजूच्या परिसराचं सुशोभीकरण केलं आहे. इथं येणाऱ्या अनुयायांसाठी सेवासुविधाही महापालिकेतर्फे देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नागपुरातील दीक्षाभूमी इथं केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी बाबासाहेबांचा अस्थिकलशाचं दर्शन घेत त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी त्यांच्याबरोबर भाजप प्रदेशाध्यक्ष चन्द्रशेखर बावनकुळे, सुलेखा कुंभारे होत्या.

**Byte - नितिन गडकरी, केंद्रीय मंत्री (२२ सेंकद)**

*डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण मानवजातीला दिलेली मानवतेची शिकवण सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.*

**<><><><><>**

गरीब, शेतकरी, युवा आणि महिला या चार घटकांना केंद्रस्थानी ठेवून सब का साथ सब का विकास या तत्त्वाच्या आधारे विविध योजनांची आश्वासनं देणारा भाजपाचा निवडणूक जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या जाहीरनाम्याचं लोकार्पण केलं. पक्षाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, आणि इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

गरिबांना शिधापत्रिकेवर मोफत अन्नधान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षं चालू ठेवण्याचा, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३ कोटी घरं बांधण्याचा, तसंच ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत आयुष्मान भारत योजना पोहोचवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. एक देश एक निवडणूक,

एकसामायिक मतदारसंघ, आणि पेपरफुटीविरोधी कायदा करण्याचं आश्वासन भाजपाने या संकल्पपत्रात दिलं आहे. महिलांना माहिती तंत्रज्ञान, पर्यटन आणि इतर क्षेत्रांमधे अधिक वाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचं तसंच पुढच्या ५ वर्षात ३ कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचं आश्वासन भाजपाने दिलं आहे.

हा जाहीरनामा तयार करण्यासाठी ज्येष्ठ नेते संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या २७ सदस्यीय समितीच्या देन बैठका झाल्या. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन आणि पीयुष गोयल हे समितीचे समन्वयक आणि उप समन्वयक होते. नमो अप च्या माध्यमातून सुमारे चार लाख आणि चित्रफितींच्या माध्यमातून सुमारे ११ लाख सूचना समितीला मिळाल्या होत्या.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज जाहीर केलेला जाहीरनामा म्हणजे खोट्या आश्वासनांचं गाठोडं असल्याची टीका काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या नेत्या आणि प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना भाजपाच्या जाहिरनाम्यावर प्रतिक्रिया दिली. भाजपाच्या जाहीरनाम्यात रोजगार मिळवून देऊ शकतील, अशा योजनांचा समावेश नाही, कृषी मालासाठी किमान आधारभूत किंमत देण्यासाठी कायदेशीर हमी या जाहिरनाम्यात दिसत नाही, तसंच महागाई कमी करण्या मुद्द्यांवर भाजपानं या जाहीरनाम्यात काहीही म्हटलेलं नाही, अशी टीका सुप्रिया श्रीनेत यांनी केली आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानं देशभरात वेग घेतला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज कर्नाटकात प्रचारसभा घेणार आहेत. आकाशवाणीवरूनही राजकीय पक्षांना प्रचारासाठी निश्चित वेळ उपलब्ध करून दिली गेली आहे. हे कार्यक्रम उद्यापासून प्रसारीत होणार आहे. यामुळे आकाशवाणी

मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या आणि परवा म्हणजेच १५ आणि १६ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारीत केलं जाणार आहे.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओ आणि भारतीय लष्करानं, रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी घेतली. राजस्थानमधे पोखरण इथे काल ही चाचणी झाली. ही यंत्रणा दिवसा तसेच रात्रीच्या परिस्थितीही वापरता येण्याच्या वैशिष्ट्यांनी सज्ज आहे. यासोबतच आधुनिक रणगाड्यांना भेदण्याच्यादृष्टीनेही सक्षम आहे. ही क्षेपणास्त्र भारतीय लष्करात दाखल होण्यापूर्वी त्यांचं अंतिम मूल्यमापन केलं जाईल संरक्षण मंत्रालयाने कळवलं आहे.

या क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ आणि भारतीय लष्कराची प्रशंसा केली आहे. ही चाचणी म्हणजे प्रगत तंत्रज्ञानावर आधारित संरक्षण प्रणाली विकासीत करण्याच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेनं टाकलेलं महत्वाचं पाऊल असल्याचं सिंह यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत, आज दुपारी साडेतीन वाजता, कोलकत्ता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपर जाएंट्स यांच्यात, तर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई इंडिअन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे.

स्पर्धेत काल चंदीगढ इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॅायल्सनं पंजाब किंग्ज्सचा ३ गडी राखून पराभव केला. राजस्थान रॅायल्सचा ६ सामन्यांमधला हा पाचवा विजय, तर पंजाब किंग्ज्सचा ६ सामन्यांमधला हा चौथा पराभव ठरला. नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतल्यावर राजस्थाननं पंजाबला निर्धारित

२० षटकांमध्ये ८ बाद १४७ धावांवर रोखलं. त्यानंतर विजयासाठी १४८ धावांचा पाठलाग करताना राजस्थाननंही ७ गडी गमावले. मात्र अखेरच्या षटकातल्या पाचव्या चेंडुवर त्यांनी विजयाला गवसणी घातली.

**<><><><><>**

मल्याळी नव वर्ष दिन अर्थात विशू आज साजरा केला जात आहे. मल्याळी परंपरेनुसार शेतात चांगलं धान्य पिकावं, या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. केरळमधील गुरुवायूर, श्री पद्मनाम मंदीर, शबरीमला ही प्रमुख मंदिरं आकर्षक फुलांनी सजवण्यात आली असून तिथं विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. केरळसह जगात जिथं जिथं मल्याळी समाज आहेत तिथं हा दिवस साजरा केला जात आहे.

**<><><><><>**

मराठा समाजाला लवकरात लवकर ओबीसी कोट्यातून आरक्षण नाही दिलं तर येत्या पाच जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू करायचा इशारा मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मराठा समाजही विधानसभा निवडणुकीची तयारी करेल, असंही पाटील यांनी सांगितलं. ते आज पत्रकार परिषदेत बोलत होते. आम्ही राजकारणात नाही, आम्ही उमेदवार दिलेला नाही आणि कोणाला पाठिंबाही दिला नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अभिनेता सलमान खान याच्या वांद्रे इथल्या निवासस्थानाबाहेर आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमाराला गोळीबार झाल्याचं वृत्त आहे. सलमान खान याला अनेकदा धमकी मिळाल्या असल्यानं, मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेनं तात्काळ या घटनेचा तपास सुरु केला आहे. मात्र या प्रकरणात अद्याप कोणालाही ताब्यात घेतलं नसल्याचं गुन्हे शाखेनं कळवलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या वायव्य भागांत अनेक ठिकाणी उद्या मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगित, बाल्टिस्तान, मुजफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड राज्यांतही उद्या मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस आणि गारपिट होण्याची शक्यता आहे.

मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, पंजाब, हरियाणा, चंडीगढ, दिल्ली, राजस्थानमध्येही अनेक ठिकाणी पुढील दोन दिवस वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि गारपिटीचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. या राज्यांत काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यताही वर्तवली आहे. राजधानी दिल्लीतही उद्या दिवसभर आकाश ढगाळ राहील. वादळी वारे वाहण्याची शक्यता असून पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**